## नियमित दिवाणी दावा क्रमांक १२९/२०२१ मधील आदेश नि.क्र.२०

१. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत झालेला विना कैफियतचा आदेश रद्दबातल होऊन त्यांची कैफियत स्वीकारण्यात यावी याबाबत विनंती केली आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द रक्कम वसुलीकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी मुदतीत त्यांची कैफियत दाखल केली नसल्यामुळे नि.क्र.१ वर दि.१५/६/२०२२ रोजी त्यांचेविरुध्द विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला आहे. सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेतल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादीच्या दाव्यास कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा विचार करता वादीस खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

### आ दे श

१. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी रक्कम रुपये रु.४००/- (रक्कम रुपये चारशे) वादीस खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीस खर्च दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

बार्शी. (श्रीमती एच.यु.यु.पाटील)

दिनांकः- २२/०६/२०२३ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Y. V. Sital |
| (b) | Court | : | Smt. H.U.U. Patil,<br>4th Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 22/06/2023. |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 23/06/2023. |